# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र.
०२०—२५६२१०४८
०२०—२५६२१०५०

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
ई—मेल
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:आयक्यूएसी/ 361

दि :– 01/12/2021

मा. प्राचार्य,
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,
शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र संलग्नित महाविद्यालये व
नॉन–एआयसीटीई अभ्यासक्रमांची महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय — शैक्षणिक वर्ष २०२१—२२ साठी माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये (M.I.S.) ऑनलाईन पध्दतीने माहिती भरणेबाबत.

संदर्भ — १.मा.संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०२१—२२/१०५८९, दि. २७ सप्टेंबर २०२१.
२.मा.शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे —१ यांचे पत्र क्र.उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/२०२१—२२/१३७९०, दि. २६ नोव्हेंबर २०२१.

महोदय/महोदया,

आपणांस विदितच आहे की, राज्यातील उच्च शिक्षणाबाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सांख्यिकीय माहितीची अत्यंत आवश्यकता असते. सदरची माहिती विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांकडून संकलित करण्यात येते.

प्रस्तुत विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८—१९, २०१९—२०, २०२०—२१ ची माहिती व्यवस्थापन प्रणालीची (M.I.S.) 100% माहिती वेब पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना उपलब्ध करून दिलेली आहे. सदरची माहिती सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांनी वेळेत उपलब्ध करून दिल्याने आपण माहिती व्यवस्थापन प्रणालीचे काम यशस्वीपणे पूर्ण करू शकलो याबद्दल आपल्या सर्वांचे आभार !

शैक्षणिक वर्ष २०२१—२२ ची माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने भरण्याची लिंक **दि. १ डिसेंबर २०२१** पासून सुरू होत असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीशी संलग्न असलेल्या पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हयामधील तसेच दादरा—नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशातील अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र व इतर नॉन एआयसीटीई अभ्यासक्रम शिकविणाऱ्या महाविद्यालयांकडून ऑनलाईन पध्दतीने विविध विवरणपत्रामध्ये माहिती मागविण्यात येत आहे. (अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूशास्त्र व व्यवस्थापनशास्त्र इत्यादी अभ्यासक्रम शिकविणाऱ्या महाविद्यालयांना माहिती व्यवस्थापन प्रणाली (M.I.S.) लागू नाही)

**माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये (M.I.S.) ऑनलाईन पध्दतीने माहिती भरताना फक्त Internet Explorer हे browser वापरावे व त्याचे Version 8.0 & above असायला हवे. त्यामुळे याच browser चा वापर करावा. इतर browser चा वापर करू नये, अन्यथा भरलेली माहिती Save होणार नाही, याची सर्व संबंधित महाविद्यालयांनी कृपया नोंद घ्यावी.**

*सर्व संबंधित महाविद्यालयांनी उक्त वेब पोर्टलवर अचूकपणे माहिती भरावी. भरलेल्या माहितीची मा.प्राचार्यांनी स्वंतत्र पडताळणी करावी. विद्यापीठ मा.संचालनालयाच्या स्तरावर माहितीची पडताळणी करताना त्रुटी असल्यास त्याला संबंधित प्राचार्य जबाबदार राहतील.*

तसेच, पुढे नमूद करण्यात येते की, माहिती व्यवस्थापन प्रणालीमध्ये (M.I.S.) ऑनलाईन पध्दतीने माहिती भरल्यानंतर विद्यापीठाकडील सर्व प्रकारच्या प्रशासकीय कामासाठी, विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी/अनुदान प्राप्तीसाठी विद्यापीठाकडून ना–हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे. महाविद्यालये/परिसंस्थांची कामे जलदगतीने होण्यासाठी, शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून सदरचे ना–हरकत प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरू करण्यात आलेली आहे. त्याची लिंक खालीलप्रमाणे आहे.

www.unipune.ac.in – BOD online - Login - for College Users - College Login ID Password - NoC Details - Fill M.I.S. information - Select Academic year– Select Nodal Officer or Teacher Name - Submit - Print NoC Format on College Letterhead. (The necessary documents to be attach) 1. Upload NoC format with Principal/Director's Sign and stamp 2. Upload M.I.S. Progress report.

ज्या महाविद्यालयांनी मा. शिक्षण संचालनालयाच्या वेबपोर्टलवर अद्याप नोंदणी केलेली नाही, अशा महाविद्यालयांनी तातडीने नोंदणी करून विहित मुदतीत माहिती भरावयाची आहे.

सदरची माहिती शासनास अत्यावश्यक असून संबंधित महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने विहित विवरणपत्रांमध्ये **दि. २५ जानेवारी, २०२२ पर्यंत** पूर्ण माहिती भरणे आवश्यक असून त्वरित ऑनलाईन माहिती भरून सहकार्य करावे.

याबाबत महाविद्यालयांना काही अडचणी उद्‌भवल्यास, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथील दूरध्वनी क्रमांक **०२०–२९७०७०९३** तसेच अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ येथील **०२०–२५६२१०४८/५०** यांचेशी संपर्क साधावा किंवा **iqac@unipune.ac.in** यावर ई–मेल करावा.

आपला,

(श्रीकांत गायकवाड)
सहायक कुलसचिव
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष

प्रत –

१. मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे – १ यांना माहितीस्तव सादर.
२. विद्यापीठातील संबंधित प्रशासकीय शाखेचे शाखाप्रमुख यांना विनंती करण्यात येते की, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाकडून देण्यात येणारे ना–हरकत प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयाच्या कोणत्याही प्रशासकीय कामकाजासंदर्भातील कागदपत्र/प्रस्ताव कार्यवाहीसाठी स्विकारू नयेत.